**आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १० टक्के आरक्षण लागु करणेबाबत....**

# महाराष्ट्र शासन

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एमईडी-१०१९/प्र.क्र.३७/१९/शिक्षण-२,**
**नववा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,लोकमान्य टिळक मार्ग,नवीन मंत्रालय,**
**मुंबई ४०० ००१,**
**तारीख:०७ मार्च,२०१९**

**संदर्भ** : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.राआधो-४०१९ / प्र.क्र. ३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रूवारी,२०१९

प्रस्तावना:

भारतीय संविधानातील अनुच्छेद १५(४) व (५) आणि अनुच्छेद १६ (४) अन्वये आरक्षणाचा लाभ देण्यात आलेल्या प्रवर्गाव्यतिरिक्त (मागासवर्गीय) राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त झालेल्या शैक्षणिक संस्था वगळुन शासकीय शैक्षणिक संस्था / अनुदानित विद्यालये, महाविद्यालये, सर्व उच्च शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्था, विना अनुदानित विद्यालये, महाविद्यालये व शैक्षणिक संस्था यामध्ये एकुण प्रवेश द्यावयाच्या जागांमध्ये १० टक्के आरक्षण सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १२.०२.२०१९ रोजीच्या शासननिर्णयान्वये विहीत करण्यात आले आहे. तसेच, शासकीय आस्थापना, निमशासकीय आस्थापना, मंडळे/महामंडळे /नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/ ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्था, प्राधिकरणे यांच्या आस्थापनांवरील नियुक्तीसाठी सरळसेवेच्या पदांमध्ये राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी १० टक्के आरक्षण देखील उक्त शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आले आहे. सदर आरक्षणाचा लाभ घेण्यासंदर्भात अटी/शर्ती उक्त शासननिर्णयात नमूद करण्यात आल्या आहेत. शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाबाबतचे आवश्यक आदेश संबंधित विभागाने तात्काळ निर्गमित करावेत, असे सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या उपरोक्त दिनांक १२.०२.२०१९ रोजीच्या शासननिर्णयात नमूद करण्यात आले

आहे. त्यानुषंगाने उक्त दिनांक १२.०२.२०१९ रोजीच्या शासननिर्णयास अनुसरुन आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आरक्षण लागु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासननिर्णय:**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राज्यातील आरोग्य विज्ञानाच्या शासकीय / महापालिका / शासनअनुदानित/ खाजगी विना अनुदानित महाविद्यालये ( अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था वगळुन) यांमध्ये एकुण प्रवेश द्यावयाच्या जागांमध्ये १० टक्के आरक्षण याव्दारे विहीत करण्यात येत आहे.

२. सदर आरक्षणाचा लाभ प्राप्त होण्याच्या अनुषंगाने पात्रता प्रमाणपत्रासंबंधातील कार्यपध्दती तथा इतर अटी / शर्ती ह्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १२.०२.२०१९ रोजीच्या शासननिर्णयात नमुद केल्याप्रमाणे राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१९०३०७१८३८४४३९१३** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(सुरेन्द्र प्र. चानकर)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मुंबई.
२) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधानभवन,मुंबई.
३) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधानभवन,मुंबई.
४) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई.
५) मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
६) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधानभवन,मुंबई.
७) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधानभवन,मुंबई.

८) मा. राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
९) मा. मुख्यसचिव,महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव,आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय,भारत सरकार, नवी दिल्ली.
११) सचिव,आयुष मंत्रालय,भारत सरकार, नवी दिल्ली.
१२) सचिव, भारतीय आयुर्विज्ञान परिषद,नवी दिल्ली.
१३) सचिव, भारतीय चिकीत्सा केद्रीय परिषद, नवी दिल्ली.
१४) सचिव, केद्रीय होमिओपॅथी परिषद, नवी दिल्ली.
१५) आयुक्त, राज्य सामाईक प्रवेशपरिक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
१६) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
१७) सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१८) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
१९) संचालक, आयुष संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
२०) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
२१) अधिष्ठाता/प्राचार्य, राज्यातील सर्व शासकीय/शासन अनुदानित/महापालिका/खाजगी विनाअनुदानित आरोग्य विज्ञान महाविद्यालये.
२२) निवडनस्ती (शिक्षण-२).